मुलांसाठी कविता

# धम्मक लाडू चापट पोळी

नलिनी तळपदे

महाराष्ट्र सरकारनें प्रथम
पारितोषिक देऊन
गौरविलेली शिशुगीतें

मुलांसाठीं कविता

# धम्मक लाडू चापट पोळी

नलिनी तळपदे

शारदा प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली

सप्टेंबर, १९६१

◎ ◎

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

◎ ◎

चित्रकार :

**म. वि. सोवनी**

◎ ◎



प्रकाशक :

**वि. नी. पटवर्धन**
शारदा प्रकाशन,
१३९२ शुक्रवार पेठ, पुणें २

किंमत ३–००

◎ ◎

मुद्रक :

**ह. म. गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४९ बुधवार पेठ, पुणें २

प्रमुख विक्रेते :
**साधना प्रकाशन,**
४३०।३१ शनवार, पुणें २

# लाडू पोळी खाण्यापूर्वीं

धम्मक लाडू का असेनात, पण ते लाडूच. चापट पोळी का असेना, पण ती पोळीच. ल्हानपणीं आम्हीं असल्या लाडू-पोळ्या पुष्कळ खाल्ल्या होत्या. त्या प्रत्यक्ष खाल्ल्या होत्या. तें गद्य होतं. तें काव्य नव्हतं. मुला-मुलांनीं म्हणायच्या त्या कविता नव्हत्या. त्यावेळीं खरोखरच वाटे, कीं शाळा बुडून जावी. रोज रोज तेंच. तरीपण मनुताईला वाटे कीं आरसा आपला बरा. त्या वाघाच्या मावशीला कुणी झांशीची राणी म्हटलं !

मधलीचं गार्‍हाणं हें, कीं खेळायला लपंडाव पाहिजे. राणी घरीं यायची असतांना कांहीं करावं म्हटलं तर छान बोर्‍या वाजतो.

मोठ्या गोड आहेत कविता. मुलांना आवडतील. मुलांच्या तोंडांत सहज घोळतील. कविता कांहीं अगदींच पोरकट नाहींत. त्यांत काव्याचीहि चुणूक आहे. कुठं ओढाताण नाहीं. संथ प्रवाह आहे गाण्यांचा.

आणि विशेष हें, कीं या कवितांत कुणाचं अनुकरण नाहीं. अलिकडे पहावं तिकडे अनुकरणं दिसतात —इंग्रजीचीं आणि मराठीचीं देखील. पण ही गाणीं अगदीं स्वतंत्र आहेत. साधीं असलीं तरी कल्पकता भरपूर आहे.

या गाण्यांना कुणी बक्षिस दिलं आहे म्हणे ! मी नुसती शाबासकी देईन—आशीर्वाद देईन. आणखी अशाच कवितांची मुलं वाट पहातील. मीहि वाट पाहीन.

१९१ साऊथ एव्हेन्यू,
नवी दिल्ली, ता. ७-९-६१

मामा वरेरकर




# अ नु क्र म

माझा फराळ
शाळा जावी बुडून
मनुताई मनुताई
आरसा आपला बरा
नाकावरती पाय माझ्या
सांगा पाहूं कारण
रोज रोज तेंच
माझी ताई
झांशीची राणी
वाघाच्या मावशी
मधलीचं गाऱ्हाणं
खेळायचा लपंडाव ग
चन्दामामा
तुला बाई माशी
राणी यायची घरीं
बोऱ्या वाजतो छान

# माझा फराळ








धम्मक लाडू चापटपोळी
न्याहारीला गालगुरोळी
पाठीचें अन् खमंग धिरडें
आई करते मधल्यावेळीं
कणिक तिंबते ताई, करितो
दादा कानाचा कानवला
बाबा आल्यावरती मिळतो
उपदेशाचा अमृतप्याला
तरी आपलें पोट उपाशीं
कुरकुर करिते आजीपाशीं
मुके मटामट घेउनि आजी
म्हणते मेली किती अधाशी



# शाळा जावी बुडून


मुसळासारख्या धारा
लिंबाएवढ्या गारा
पडून चांगला सुटावा
सोसाट्याचा वारा
दारं खिडक्या मोडून
छप्पर जावं उडून
कमरेएवढ्या पाण्यांत
शाळा जावी बुडून
अभ्यास पाहिजे नवा
वरचा वर्ग हवा


बाई म्हणतात तरी हिला
त्याच वर्गांत ठेवा
बाईंचा नि अभ्यासाचा
राग आला मला
उगाच नाहीं शाळेला मी
शाप असा दिला
तुला म्हणून सांगतें
बोलूं नकोस कुठें
शाळेसाठीं आईचा मी
मार रोज खातें






# मनुताई






मनुताई, मनुताई
असं कसं झालं
उंदराचं पिटुकलं
तुरुतुरु गेलं
कां नाहीं धरलं
कां नाहीं मारलं
कुणाला पाहून
भान असं हरलं— ?
मनुताई, मनुताई
सांग तरी मला
खात नाहींस पीत नाहींस
काय होतं तुला— ?
बोललं वाटतं कुणी
मारलं वाटतं कुणी
उगी उगी नको आणूं
असं डोळ्यांत पाणी



घेतेस ना दूध मग
    गरम गरम ताजं
असं काय बरं
    ऐकणार न माझं–
खाल्ल्याशिवाय कांहीं
    झोंप येईल कशी
कीं जागतच बसणार
    रात्रभर अशी– ?




काय तुझ्या मनांत
    सांग माझ्या कानांत
नको सांगू सारं कांहीं
    आलंय माझ्या ध्यानांत
कुणी नाहीं बोललं
    कुणी नाहीं मारलं
काशीला जायचं
    वय तुझं झालं




आई म्हणते पी हळद
हो गोरी गोरी
बाबा म्हणतात नकटं तुझं
नाक कसं पोरी
दांतपडकी म्हातारी
पहा कशी हंसते
ताई म्हणते अहा किती
ध्यान सुंदर दिसते
दादा म्हणतो पक्का रंग
जाणार नाहीं कधीं
लगीन ठरवतांना आपण
घालूं भट्टीमधीं
बाबा, आई, दादा, ताई
हंसतात सारीं मला
आरसा आपला बरा
मी छा ऽ ऽ न दिसते त्याला



# आरसा आपला बरा!



# नाकावरती पाय माझ्या




एवढासा ससा त्याचे
एवढे मोठे कान
एवढा मोठा हत्ती त्याचं
शेपूट मात्र लहान
मान वर करून जिराफ
बघतो तरी काय
पोटांत पाय घालून कशी
चालते गोगलगाय— ?

कुत्र्याचं शेपूट आपलं
नेहमींच वाकडं
माणसांसारखी सहीसही
दिसतात कशीं माकडं— ?
दोन पाय छोटे
दोन पाय मोठे
कांगारूच्या पोटाला
पिशवी कोण शिवतें — ?




एक डोळा बंद करून
बगळा बसतो टपून
पाठीवरचं ओझं कसं
कासव ठेवतं जपून– ?
पंख असून शहामृग
उडत नाहीं कसं–
कुणी दिली मोराला
हीं रंगीत पिसं– ?



डोळे मिटून मनीमाऊ
दूध कां पिते
उभ्या उभ्या घोड्याला या
झोंप कशी येते– ?
उंच उंच आभाळांत
घार कशी उडते
पाणी नाहीं डोळ्यांत
न सुसर कशी रडते– ?
जाऊं दे ते सारं आई
एक सांग मला
नाकावरती म्हशीनीं का
पाय माझ्या दिला– ?







# सांगा पाहू कारण



खिडक्यांना पडदे
दाराला तोरण
काय आहे आमच्या घरीं
सांगा पाहूं कारण– ?
गरम गरम चहा
शिरा न् पोहे
सांगा बरं आमच्या इथें
आज काय आहे– ?
विणलेले रुमाल
भरलेलीं मुलं
शिंपल्याचे पक्षी
आणि कागदाचीं फुलं–
सारं कांहीं रचून
ठेवलंय कशासाठीं
नटून थटून ताई उभी
सांगा कुणासाठीं– ?






# रोज रोज तेंच

समोरच्या अंगणांत
सांडगे घातलेत वाळत
पलीकडच्या छपरावरून
नीट ठेवा पाळत
करूं नका घाई
बोलूं नका कांहीं
पावलांचा आवाजसुद्धां
होऊं द्यायचा नाहीं
रोज खातों खडे
रोज मारतो किडे
आज मात्र माझ्यासाठीं
सांडगे आण थोडे

नीट बसा लपून
पावलं टाका जपून
काठी घेऊन कुणीतरी
बसलं असेल टपून
तुमचं आपलं कांहींतरीच
चोरी कसली त्यांत
उघड्यावरचं खातों कांहीं
घरांत नाहीं जात
हवे तेवढें खाऊन
आणा थोडें चोचींत
रोज रोज तेंच जरा
बदल हवा रुचींत




# माझी ताई




गालावरती खळी
नाक चाफेकळी
रूपानं छान पण
रंगानं काळी
चालते आपल्या तालांत
हंसते हळूं गालांत
सुट्टीच्या दिवशीं
खेळते आम्हां मुलांत
दमून येते तरी
काम करते घरीं
आजाराला आईच्या
जपते परोपरी

एक होता कावळा न्
एक होती चिमणी
कधीं सांगते गोष्ट न्
कधीं म्हणते गाणीं
अशी माझी ताई
आहे मोठी गुणी
घेऊन जाईल राजा
न् होईल पट्टराणी




# झांशीची राणी




शाळेमधल्या नाटकांतली
मर्दानी ती झांशीवाली
ढाल छातीशीं पुत्र पाठीशीं
घेऊनि लढण्या सिद्ध जाहली
बांधुनि फेटा सुंदर मोठा
कमरेला तलवार तळपती
पराक्रमाच्या तेवत होत्या
नयनांमध्यें सुंदर ज्योति




उघडायाचा पडदा तेव्हां
कुठें शिंकली कळे न माशी
गरगर डोळे फिरवी राणी
कुठलें नाटक कुठली झांशी
अंगरख्याच्या आंत राणीच्या
लांब मिशांचें झुरळ मिळालें
तोंडाचें नि पळून पाणी
राणीचें अवसान गळालें






# वाघाच्या मावशी


वाघाच्या मावशी
ए मनुमावशी
पाऊल नाहीं वाजत
तूं चालतेस कशी— ?
लावत नाहींस हात
लावत नाहींस दांत
पिल्लांना अलगद
धरतेस कशी— ?
नखं तुझीं आंत
दिसत नाहींत कधीं
बोचकारायला बाहेर
तूं काढतेस कशीं— ?








घरभर फिरून
उंदीर खातेस मारून
चुलीवरचं दूध तरी
सांडतेस कशी — ?
ठेवल्या वरती धरून
मिशा ताठ करून
म्यांव म्यांव गुर्र गुर्र
भांडतेस कशी— ?
पोत्यांत घालून तुला
दूर नेलं तरी
पुन्हां आपली घरीं
तूं येतेस कशी— ?



# मधलीचं गाऱ्हाणं






असावं तर लहान
नाहींतर मोठं
मधलीचं मी म्हणतें
नशीबच खोटं
पहिली बेटी धनाची पेटी
कौतुक होतं ताईचं
बाळ आमचं शेंडेफळ
त्यांतून नव्या नवसाचं
मोठी म्हणून ताईला
कध्धीं नाहीं चिडवायचं
लहान म्हणून बाळाला
मुळीं नाहीं रडवायचं
लहानांची मर्जी आणि
मोठ्यांचा मान
मधल्या मधें आमचं मात्र
सँडविच होतं छान
नवे परकर, नव्या साड्या
थाट सगळा ताईचा
बोललें जरा कांहीं तर
पर्वत होतो राईचा








मनापासून सारीं कामं
करायचीं मी ताईचीं
आईलाही मदत – कारण
वेळ तिची घाईची
ताई जाते कॉलेजांत
अभ्यास तिचा केवढा
संभाळ म्हटलं बाळाला तर
डोळा करते एवढा
आहे तरी पहा कसा
बाळराजा गुणी
त्यालासुद्धां माझ्याशिवाय
नकोच असतं कुणी
सदान्कदा त्याला हव्या
गोष्टी आणि गाणीं
अभ्यासावर पडतं माझ्या
घागरीएवढं पाणी
इतकं करून शेवटीं
चुकलं जरा कांहीं
वर आई म्हणते मेलीचं
लक्षच कशांत नाहीं

# खेळायचा लपंडाव ग !



खेळायाचा लपंडाव ग
राज्य तुझ्यावर आलें
काढ शोधुनि आतां मजला
ही बघ मी लपलें
खेळायाचा लपंडाव नच
कोशिंबीर आंधळी
सदाकदा मग शोधायाची
अमुच्यावर पाळी
राजकुमारी म्हणुनि आलें
राज्य तुझ्यावरतीं
डोळे मिटुनी हंसतमुखानें
घे अपुल्या हातीं






राज्य पृथ्वीचें दिलेस तरीही
नकोच या वेळीं
तुझ्यावरी मी रुसलें आणि
बोलूं नको तूं मुळीं

असा कशाला गडे अबोला
नको पाठशिवणी
खेळूं आपण भातुकली अन्
होऊं या विहिणी
लग्न लावूं या थाटाचें चल
तुझा नवरदेव
नवरी माझी गरीबभोळी
तिला सुखी ठेव





कळलें नाहीं मजला आणि
उगाच मी रुसलें
रंग मनांतिल रागाचे परी
पाण्यानें पुसले


# चन्दामामा



चन्दामामा घर तुझं
लांब लांब लांब
पाय दुखतील चालून जरा
थांब थांब थांब
चालूं नको असा गडया
झप झप झप
निंबोणीच्या झाडामागें
लप लप लप
निंबोणीच्या खालीं घर
छान छान छान



तुझ्यासारखी आई गोरी
पान पान पान
तुझ्यासारखं तोंड तिचं
गोल गोल गोल
भाऊ ना रे आईचा तूं
बोल बोल बोल
तिच्या हातचा खाऊ देते
गोड गोड गोड
अळीमिळी गुपचिळी
सोड सोड सोड



# तुला बाई माशी




तुला बाई माशी
रीत नाहीं कशी
विचार नाहीं पूस नाहीं
घुसतेस अशी
विचारायचं आधीं
येऊं ना मी मधीं–
बाई बाई तुला हें
कळणार कधीं– ?
यायचं तर येऊन
बसायचं नीट पाटावर
तेंसुद्धां नाहीं तूं
बसतेस उघड्या ताटावर
सोवळं नाहीं ओंवळं नाहीं
शिवतेस सगळीकडे
तुझ्या आपले सदाचेच
कानीं सात खडे
सर्दी झाल्यावर तरी
येऊं नकोस बाई
शिंकल्यावरती माशी म्हणे
काम होत नाहीं.

# राणी यायची घरीं

सरसर कोळ्या तुझं
काढून टाक जाळं
राणी आल्यावरती तुझी
भरतील घटकापळं
तुम्ही सुद्धां उंदीरमामा
बघूं नका असे
राणी यायच्या आधीं इथून
निघून जा कसे



पळ पळ चिऊताई
बिऱ्हाड टाक मोडून
राणी यायची घरीं
तिची जागा जा सोडून
अहो तुम्ही झुरळोजी
साफ करा मिशा
फडताळांतून मुकाट्यानं
गुंडाळा हा गाशा



आणि तुम्हीं ढेकूणराव
सोडून देऊन खाट
राणी यायच्या आंत
आपली सुधारावी वाट
इवलं इवलं बाळ घेऊन
राणी येईल घरांत
तुमच्यासह काढील माझी
गाढवावरून वरात



# बोऱ्या वाजतो छान





ओरडण्यानं दादाच्या
घर आमचं गाजतं
ताईचं तर तुणतुणं
नेहमींच वाजतं
बँडबाजा बाळाचा
किटतात त्यांनीं कान
परीक्षेला माझा कसा
बोऱ्या वाजतो छान

